# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

# Model Paper

Marathi Medium
English Medium

aglasem.com

# प्रथम भाषा : मराठी – इयत्ता : चौथी

## इयत्ता : चौथी – विषय : मराठी (लेखी)

**विद्यार्थ्याचे नाव :** ______________________ **हजेरी क्रमांक :** ☐

**शाळेचे नाव :** ______________________ **तुकडी :** ______

**केंद्र :** ________ **ता.** ________ **जि.** ________ **दिनांक :** / /

| | लेखी | | | | | | तोंडी | | प्राप्त गुण | | | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | मूलभूत क्षमता प्रश्न क्र. १ व ७ | इयत्तेच्या क्षमता | एकूण | |
| प्राप्त गुण | | | | | | | | | | | | |
| कमाल गुण | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | १० | ३० | ४० | |

**प्र. १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ______________ २) ______________

३) ______________ ४) ______________

५) ______________ ६) ______________

७) ______________ ८) ______________

९) ______________ १०) ______________



docs.aglasem.com

aglasem.com

**प्र. २.** खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

तो काळ पारतंत्र्याचा होता. संपूर्ण देशाला इंग्रजांनी गुलाम बनवून ठेवले होते. जंगलात राहणारे आदिवासीही या गुलामगिरीतून वाचले नव्हते. इंग्रजांनी वन–कायदा करून आदिवासींचा जंगलावरचा पारंपरिक अधिकार नाकारला होता. त्यामुळे आदिवासींमध्ये इंग्रजांच्या विरुद्ध असंतोष निर्माण झाला होता.

१८९४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. उपासमार व रोगराईत अनेक लोक मरण पावले. तशातच ब्रिटिशांनी जमीनदार व जहागीरदारांकरवी शेतकऱ्यांवर अवाजवी शेतसारा लावला होता. याविरुद्ध बिरसाने वेळोवेळी जनआंदोलन केले. यामुळे संतप्त होऊन इंग्रज सरकारने १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांना दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. त्यांना हजारीबाग तुरुंगात डांबण्यात आले. याच तुरुंगात बिरसांनी इंग्रजी सत्ता मुळासकट उखडून टाकण्याचा संकल्प केला आणि आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुद्ध लढा पुकारला. त्यासाठी त्यांनी एक घोषवाक्य दिले. एकमेकांना भेटल्यावर आदरभाव व्यक्त करण्यासाठी 'उलगुलान' म्हणावे, असे सांगितले.

**अ)** बिरसा मुंडा यांना कोणत्या तुरुंगात ठेवण्यात आले होते? (गुण १)
योग्य पर्यायाच्या क्रमांकास गोल कर.

१) बिहार  २) हजारीबाग  ३) येरवडा

**ब)** बिरसा मुंडा यांनी कोणते कार्य केले? (गुण २)

________________________________________

________________________________________

**क)** आदिवासींमध्ये इंग्रजांच्या विरुद्ध असंतोष का निर्माण झाला? (गुण २)

________________________________________

________________________________________

________________________________________



docs.aglasem.com

aglasem.com

**प्र. ३.** खालील जाहिरात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

**खुशखबर!** **खुशखबर!** **खुशखबर!**



*''विद्यार्थी, पालक व शिक्षकांसाठी सुवर्णसंधी''*

## 'बालमहोत्सव'

स्पर्धेसाठी नोंदणी फी प्रत्येकी ५ रु.

**• रांगोळी स्पर्धा • वैयक्तिक गीतगायन स्पर्धा**

**• वैयक्तिक नृत्य स्पर्धा • कथाकथन • वेशभूषा • एकांकिका**

तसेच अनेक नामवंत प्रकाशनांच्या पुस्तकांचे प्रदर्शन

**स्पर्धेत प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास प्रदर्शनातील आवडीची ५ पुस्तके भेट.**
**द्‌वितीय क्रमांकाच्या विजेत्यास आवडीची ३ पुस्तके भेट.**

**आयोजक : अहिल्या महिला मंडळ, जळगाव.**

**स्थळ : विद्यानिकेतन विद्यालय मैदान, जळगाव.**

**• कालावधी : दि. ५ ते १० एप्रिल २०१८** **• वेळ : स. १०.०० ते सायं. ५.०० पर्यंत**

**अ)** बालमहोत्सव कोठे आयोजित केला आहे? (गुण १)

---

---

**ब)** बालमहोत्सव किती दिवस चालणार आहे? (गुण २)

---

---

**क)** बालमहोत्सवात विद्यार्थ्यांसाठी कोणकोणत्या स्पर्धा आयोजित केलेल्या आहेत? (गुण २)

---

---

---



docs.aglasem.com

aglasem.com

**प्र. ४.** खालील प्रश्न दिलेल्या सुचनेनुसार सोडव.

**अ)** खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिही.

आई म्हणाली, ''अरे राजा एक छोटसं काम करशील का रे'' (गुण १)

______________________________

**ब)** कंसात दिलेल्या शब्दसमूहांचा योग्य जागी योग्य बदलासह वापर कर. (गुण २)

(कुतूहल वाटणे, निरीक्षण करणे, आवड असणे)

रमेश ताईसोबत बागेत फिरत होता. फिरता फिरता बागेतील फुलांचे ____________

होता. शेजारच्या विक्रेत्याजवळील खेळण्यांचे त्याला ____________

**क)** कंसात दिलेल्या म्हणीपैकी योग्य अर्थाची म्हण निवडून वाक्य पूर्ण कर. (गुण २)

(काखेत कळसा नि गावाला वळसा, नाचता येईना अंगण वाकडे, लहान तोंडी मोठा घास.)

कविताच्या चपात्या का करपल्या म्हणून आईने विचारले, तर कविता म्हणाली,''तवा पातळ आहे''

म्हणतात ना ______________________________



docs.aglasem.com

aglasem.com

**प्र. ५.** खालील चित्र पहा आणि त्यावर आधारित गोष्ट लिही. (गुण ५)





docs.aglasem.com
aglasem.com

**प्र. ६.** खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे गोष्ट लिही. (गुण ५)

काही मुले बसची वाट पाहत उभी आहेत. थोड्या वेळाने एक बस येते. लोक बसमध्ये चढतात. बस निघून जाते. तेव्हा मुले बघतात की, रस्त्यावर एक पाकीट पडलेले आहे. ते बसमध्ये चढणाऱ्या एखाद्या प्रवाशाचेच असणार असे मुलांना वाटले. पाकीट पाहून आता काय करायचे...

■■■



docs.aglasem.com

aglasem.com